# प्रेस नोट

दिनांक २८/०२/२०१९

## कल्याण–डोंबिवली मनपा येथील लिपीकास लाचेच्या स्वरूपात शरीर सुखाची मागणी करताना अटक

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | **ठाणे** |
| गुन्हा नोंद क्रमांक | –– |
| कलम | –– |
| आरोपीचे नाव व कार्यालय | **रमेशचंद्र लक्ष्मण राजपूत, वय ४८ वर्षे, लिपीक, कर प्रभाग क्षेत्र 'क' कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण, वर्ग–३** |
| मागितलेल्या लाचेचे स्वरूप | **शरीर सुखाची मागणी** |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | –– |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांच्या राहत्या घराचा प्रलंबित असलेला मालमत्ता कर भरण्यासाठी वरील नमुद लोकसेवक यांनी जप्ती वॉरंट बजावणी पुर्व अखेरची सुचना केली होती. सदर नोटीसच्या अनुषंगाने नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांना मालमत्ता कर भरण्यास मुदत वाढवून देण्यासाठी व मालमत्ता कराची रक्कम कमी करून देण्यासाठी लाचेच्या स्वरूपात **शरीर सुखाची** मागणी केली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २६/०२/२०१९ रोजी पडताळणी केली असता, वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेच्या स्वरूपात शरीर सुखाची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन ला.प्र.वि., ठाणे विभाग यांनी सापळ्याचे आयोजन केले असता, दिनांक २८/०२/२०१९ रोजी १२:४५ वा. लोकसेवक **रमेशचंद्र लक्ष्मण राजपूत** यांनी तक्रारदार यांना **सुभाष मैदान, कल्याण येथे बोलावून घेवून, सदरबाबत** बोलत असताना त्यांना ताब्यात घेण्यात आले. |

लाचलुचपत प्रतिबधंक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबदद्ल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :– **ला.प्र.वि., ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१**
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं :– १०६४
दुरध्वनी क्र. :– ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस् ॲप क्र. :– ९९३०९९७७००

( डॉ. महेश पाटील )
पोलीस अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
ठाणे परिक्षेत्र, ठाणे

पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

Scanned by CamScanner